महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ
रवींद्र नाट्यमंदिर, दुसरा मजला, सयानी मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.
(दूरध्वनी क्र. : २४२२ ९०२०, २४२२ ९०२७)
ई-मेल : vinimaprashasan@yahoo.co.in, website — www.marathivishwakosh.maharashtra.gov.in

जा.क्र. विनिमं २०१९/ मंडळबैठक / ८०५
दिनांक ०६.११.२०१९.

प्रति,

१) श्री. दिलीप करंबेळकर, अध्यक्ष
२) डॉ. अरुण भोसले, सदस्य
३) डॉ. नागोराव कुंभार, सदस्य
४) डॉ. राजन गवस, सदस्य
५) डॉ. ऋजूता हाडये, सदस्य
६) श्री. संतोष शेलार, सदस्य
७) मेजर जनरल शशिकांत पित्रे, सदस्य
८) डॉ. अरुणचंद्र पाठक, सदस्य
९) डॉ. भीमराव उल्मेक, सदस्य
१०) डॉ. नामदेव मेश्राम, सदस्य
११) डॉ. शिरीष नखाते, सदस्य
१२) डॉ. संजय तांबट, सदस्य
१३) डॉ. बाळ फोंडके, सदस्य
१४) डॉ. नीरज हातेकर, सदस्य
१५) प्रा. लक्ष्मणराव टोपले, सदस्य
१६) श्री. श्रीकांत उमरीकर, सदस्य
१७) डॉ. सर्जेराव ठोंबरे, सदस्य
१८) श्रीमती नीलिमा कढे, सदस्य
१९) प्रा. डॉ. सविता लडगे, सदस्य
२०) श्रीमती चारुशीला जुईकर, सदस्य
२१) श्री. दिनकर कांबळे,सदस्य
२२) श्री. सिध्दाराम पाटील, सदस्य
२३) डॉ. अरुणा ढेरे, सदस्य
२४) डॉ. श्रीनंद बापट, सदस्य
२५) डॉ. दीपक जेवणे, सदस्य
२६) श्री. माधव चौंडे, सदस्य
२७) श्री. राहूल देशमुख, सदस्य
२८) डॉ. हेमचंद्र प्रधान, सदस्य
२९) डॉ. गणपत माने, सदस्य
३०) प्रा. अविनाश कोल्हे, सदस्य
३१) श्री. राजेंद्र कोंढरे, सदस्य

विषय : दि. २९.०८.२०१९ रोजी झालेल्या मंडळाच्या बैठकीचे इतिवृत्त पाठविण्याबाबत.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, मराठी विश्वकोशाच्या www.marathivishwakosh.org या संकेतस्थळाचे उद्‌घाटन व नवीन अद्ययावत मराठी विश्वकोश खंड १ ते २०, ज्ञानमंडळ, शब्दकोश मोबाईल ॲपचे लोकार्पण दि. २९ ऑगस्ट, २०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता अटल स्मृती

कृ.मा.प.......

उद्यान, बोरिवली या ठिकाणी मा. मंत्री, मराठी भाषा विभाग यांच्या हस्ते तसेच महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाची बैठक अटल स्मृती उद्यान, बोरिवली (पश्चिम) मुंबई येथे मंडळाचे मा. अध्यक्ष श्री. दिलीप करंबेळकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या बैठकीचे इतिवृत्त या पत्रासोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

आपला विश्वासू,

(हर्षवर्धन तु. जाधव)
सचिव (अ. का.)
महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई.

प्रत-

१. सहायक सचिव, मराठी विश्वकोश कार्यालय, वाई जि. सातारा.

93614

## महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ

### मंडळाची दिनांक २९ ऑगस्ट, २०१९ रोजी मुंबई येथे झालेल्या बैठकीचे इतिवृत्त

मराठी विश्वकोशाच्या www.marathivishwakosh.org या संकेतस्थळाचे उद्घाटन व नवीन अद्ययावत मराठी विश्वकोश खंड १ ते २०, ज्ञानमंडळ, शब्दकोश मोबाईल ॲपचे लोकार्पण दि. २९ ऑगस्ट २०१९ रोजी सकाळी ११.०० वा. मा. ना. श्री. विनोद तावडे, मंत्री, मराठी भाषा विभाग यांच्या हस्ते तसेच महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाची बैठक अटल स्मृती उद्यान, शिंपोली टेलिफोन एक्सचेंज, शिंपोली रोड विरुध्द, शिवाजी नगर, शिंपोली, बोरिवली (पश्चिम) मुंबई येथे मंडळाचे अध्यक्ष मा. श्री. दिलीप करंबेळकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | डॉ. अरुण भोसले | सदस्य |
| २ | डॉ. राजन गवस | सदस्य |
| ३ | डॉ. ऋजुता हाडये | सदस्य |
| ४ | डॉ. अरूणचंद्र पाठक | सदस्य |
| ५ | डॉ. भीमराव उल्मेक | सदस्य |
| ६ | डॉ. शिरीष नखाते | सदस्य |
| ७ | डॉ. बाळ फोंडके | सदस्य |
| ८ | डॉ. नीरज हातेकर | सदस्य |
| ९ | श्री. श्रीकांत उमरीकर | सदस्य |
| १० | श्रीमती चारूशीला जुईकर | सदस्य |
| ११ | श्री. दिनकर कांबळे | सदस्य |
| १२ | श्री. सिध्दराम पाटील | सदस्य |
| १३ | डॉ. श्रीनंद बापट | सदस्य |
| १४ | श्री. माधव चौंडे | सदस्य |
| १५ | श्री. राहूल देशमुख | सदस्य |
| १६ | डॉ. हेमचंद्र प्रधान | सदस्य |
| १७ | श्री. शामकांत बा. देवरे | सदस्य सचिव |

मंडळाचे सचिव श्री. शामकांत देवरे यांनी मा. अध्यक्ष, सदस्य यांचे स्वागत केले. त्यानंतर मा. अध्यक्षांच्या अनुमतीने बैठकीच्या कामकाजास सुरुवात करण्यात आली. सदर बैठकीमध्ये पुढील विषयाबाबत चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले.

| अ. क्र. | विषय | चर्चेचा गोषवारा | निर्णय |
|---|---|---|---|
| १ | मां. मंत्री, मराठी भाषा विभाग यांच्या हस्ते मराठी विश्वकोशाच्या अद्ययावतीकरणासाठी | मां. मंत्री, मराठी भाषा विभाग यांच्या हस्ते मराठी विश्वकोशाच्या https://marathivishwakosh.org/ या नवीन संकेतस्थळाचे उद्घाटन, मोबाईल ॲपचे | |

979

| | | | |
|---|---|---|---|
| | तयार करण्यात आलेल्या https://marathivishwakosh.org/ या नवीन संकेतस्थळाचे उद्घाटन व नवीन अद्ययावत मराठी विश्वकोश खंड १ ते २०, ज्ञानमंडळ, शब्दकोश मोबाईल ॲपचे लोकार्पण. | लोकार्पण झाले.<br>यावेळी बोलताना मराठी विश्वकोशाचे संकेतस्थळ आणि ॲपबरोबरच आता तो ऑगमेंटेड आणि व्हर्च्युअल रिॲलिटीमध्ये साकारण्याचा आगामी काळात विचार करायला हवा. कारण आधुनिक डिजिटल तंत्रज्ञान वापरून विश्वकोश तरुणाईपर्यंत पोहोचविता येईल.<br>त्याचबरोबर बालभारतीच्या व इतर शालेय आणि महाविद्यालयीन पुस्तकांमध्ये विश्वकोशातील नोंदीचा संदर्भ टीपा म्हणून कसा वापर करता येईल याचा विचार करावा तसेच विश्वकोश मंडळाला बळकटी देणे हे शासन म्हणून आमचं कर्तव्य आहेच आणि तीच सर्वार्थाने मराठी भाषेची सेवा ठरेल असे मा. मंत्री यांनी भाषणात सांगितले.<br>मा. अध्यक्षांनी ज्ञानवंतांचे नेटवर्किंग, संपर्क तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर आणि वाचकाभिमुख काम या तीन मुद्दयांभोवती विश्वकोशाचे कार्य आधारित असल्याचे त्याचबरोबर समूह सहभागावर भर असल्याचे सांगत विश्वकोशातील नोंदीमध्ये मूल्यवर्धनासाठी ऑडिओ-व्हिडीओचा समावेश केल्याचेही विशेषत्वाने त्यांनी सांगितले.<br>डॉ. फोंडके यांनी " जर्मन ते इंग्रजी " असा ज्ञानभाषेचा झालेला प्रवास भारतीय शास्त्रज्ञ सत्येंद्रनाथ बोस यांनी समीक्षा आणि प्रकाशनासाठी आइनस्टाईनला पाठविलेला इंग्रजीतील शोधनिबंध, आइनस्टाईन यांनी कसा बोस यांच्या नावानिशी जर्मन भाषेत प्रकाशित केला याविषयी माहिती दिली. | |
| २ | दिनांक २६ मार्च २०१९ रोजी मुंबई येथे मंडळाच्या झालेल्या बैठकीतील वृत्तांतास मान्यता देणे. | वृत्तांतावर चर्चा करण्यात आली. | सर्वानुमते वृत्तांतास मान्यता देण्यात आली. |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | ज्ञानमंडळाच्या कामकाजासंबंधात प्रगतीचा आढावा घेणे व त्या आधारावर पुढील निर्णय घेणे. | ज्ञानमंडळांच्या विविध गटानुसार पुढील काळात पाठपुराव्यासाठी बैठका घ्याव्यात असा निर्णय घेण्यात आला. | |
| ४ | मराठी विश्वकोश अद्ययावतीकरणासाठी ई-गव्हर्नन्स व ज्ञानमंडळनिहाय माहिती संकलन-प्रसारण या कामांबाबतच्या करारास मुदतवाढ देणे. | १) मराठी विश्वकोशाच्या ज्ञानमंडळाच्या कामकाजासाठी वेबपोर्टल, अनुषंगिक तांत्रिक बाबींची पूर्तता व देखभाल करणे.<br>२) ज्ञानमंडळांनी केलेल्या नोंदी व विश्वकोशातील दृकश्राव्य चित्रफितीसहीत सर्व प्रकारची माहिती मोबाईलवरून थेट पाहता यावी यासाठी अँड्रॉइड आणि आयओएस मोबाईल अॅपची निर्मिती करणे.<br>३) विश्वकोशाच्या सध्याच्या संकेतस्थळावरील नोंदी नवीन सॉफ्टवेअरमध्ये घेण्याची व्यवस्था व सॉफ्टवेअर वापराचे वेळोवेळी लागणारे संबंधित अद्ययावत प्रशिक्षणे देणे.<br>वरील तिन्हीं बाबीकरीता प्रबंध संचालक, अनन्या मल्टीटेक प्रा. लि., डोंबिवली यांच्यासमवेत दि. ५ नोव्हेंबर २०१८ रोजी १ वर्षासाठी करार करण्यात आलेला होता. | https://marathivishwakosh.org/ व<br>https://vishwakosh.marathi.gov.in/ या दोन्हीं संकेतस्थळाचे व मराठी विश्वकोश अँड्रॉइड व आयओएस दोन्हीं मोबाईल अॅप यांचे व्यवस्थापन, देखभाल व दुरुस्तीच्या कामास कराराची मुदत संपल्यापासून पुढील १ वर्षांसाठी अनन्या मल्टीटेक प्रा. लि., डोंबिवली यांस मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. |
| ५ | विश्वकोशाचा अधिकाधिक प्रचार व प्रसार होण्याकरीता वेगवेगळे उपक्रम हाती घेणे. | माहिती तंत्रज्ञान-संगणकविज्ञान हे ज्ञानमंडळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे कार्यरत आहे. या ज्ञानमंडळात लिहिणारे लेखकांची संख्या वाढविण्यासाठी तसेच या ज्ञानमंडळाचा महाराष्ट्रभर अधिकाधिक प्रचार व प्रसार होण्याकरीता सद्यस्थितीत असलेल्या ज्ञानमंडळाच्या कराराचे स्वरूप कायम ठेवून या विषयाचे उपज्ञानमंडळ विभागनिहाय करावे व मराठी विकिपिडीया व विश्वकोश यांच्या संयुक्त विद्यमाने १०० ते १५० लेखकांची कार्यशाळा घ्यावी असे श्री. राहूल देशमुख यांनी सांगितले.<br>तसेच डॉ. नागोराव कुंभार यांनी | ज्ञानमंडळाचा प्रचार व प्रसार होण्याकरीता व लेखकांची संख्या वाढण्याकरीता ज्ञानमंडळातंर्गत उपज्ञानमंडळ स्थापन करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | विषय क्र. ५ व ९ याबाबत पाठविलेल्या सूचनांचे पत्राचे वाचन केले. सूचना स्वागतार्ह असून त्यावर यथावकाश निर्णय घेण्यात येईल असे मा. अध्यक्षांनी सांगितले. | |
| ६ | विश्वकोशाचे आगामी वाढते काम लक्षात घेऊन त्याकरीता उपाययोजना करणे. | सद्यस्थितीत ४४ ज्ञानमंडळांची स्थापना झालेली आहे. या ज्ञानमंडळाच्या माध्यमातून माहे ऑगस्ट २०१९ पर्यंत २८६४ नोंदी प्राप्त झाल्या असून त्यापैकी १७९६ नोंदी विद्याव्यासंगी सहायक / संपादकीय सहायक यांनी तपासल्या आहेत. १७०३ नोंदी प्रकाशनासाठी अंतिम केल्या असून १५१० नोंदी संकेतस्थळावर प्रकाशित केल्या आहेत. अजूनही १०६८ नोंदी तपासण्याचे काम बाकी आहे. तसेच अंतिम केलेल्या १७०३ नोंदीपैकी १९३ नोंदी संकेतस्थळावर प्रकाशित करावयाच्या आहेत. या ज्ञानमंडळांच्या माध्यमातून नोंदी येण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. सध्या विद्याव्यासंगी सहायक / संपादकीय सहायक अशी १० कर्मचारी कार्यरत आहेत. एका संपादकीय कर्मचाऱ्याकडे ५ ते ६ ज्ञानमंडळाची जबाबदारी आहे. त्यामुळे आलेल्या नोंदीचे समीक्षण, संपादन काम लवकर होण्यास अडचणी निर्माण होत आहेत.<br>नोंदी संपादनाचे काम लवकर होण्याकरीता या क्षेत्रात काम करणारे तज्ज्ञ व्यक्ती, संपादक, अशा प्रकारचे काम करू शकणारी संस्था यांना विश्वकोशाच्या कामाचे स्वरूप, नोंद लिखाण, तपासणी प्रशिक्षण देऊन काम पूर्ण करता येऊ शकते असे मा. अध्यक्षांनी सांगितले. | नोंदी संपादनाचे काम लवकर होऊन संकेतस्थळावर प्रकाशित होण्याकरीता तज्ज्ञ व्यक्ती, संपादक, अशा प्रकारचे काम करू शकणारी संस्था यांना विश्वकोशाच्या कामाचे स्वरूप, नोंद लिखाण, तपासणी प्रशिक्षण देऊन हे काम करून घेण्यास सर्वानुमते तत्वतः मान्यता देण्यात आली. |
| ७ | 123 RF.COM या संकेतस्थळावरून नोंदीमध्ये चित्रे घेण्यास परवानगी देणे. | 123RF.COM या संकेतस्थळावरून घेतलेली चित्रे वापरकर्त्यांपर्यंतच न राहता ती सर्वांना वापरता यावी तसेच https://commons.wikimedia.org/ या संकेतस्थळावरूनही कॉपीराईट मुक्त चित्रे घेता येतात असे श्री. राहूल देशमुख | 123RF.COM या संकेतस्थळावरून चित्रांचे पॅकेज दरमहा, वार्षिक गरजेनुसार घेण्यास व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता सर्वानुमते मान्यता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | यांनी सांगितले. 123RF.COM या संकेतस्थळावरून घेतलेली चित्रे वाचकांना वापरता येतील याबाबत तपासणी करण्यात येईल असे मा. अध्यक्षांनी सांगितले. | देण्यात आली. |
| ८ | मंडळाच्या मुंबई येथील प्रशासकीय कार्यालयात खाजगी कंपनीव्दारे इंटरनेट सुविधा घेण्यास कार्योत्तर मान्यता देणे. | ज्ञानमंडळाच्या माध्यमातून आलेल्या नोंदी संकेतस्थळावर प्रकाशित करण्याचे काम मुंबई कार्यालयात होते. परंतु मागील ३ महिन्यांपासून इंटरनेट सेवा सुरळित चालत नाही. परिणामी संकेतस्थळावर नोंदी प्रकाशित करण्याच्या कामामध्ये अडचण निर्माण होत आहे. सद्यस्थितीत MTNL चे इंटरनेट कनेक्शन आहे. कार्यालयाचे पाठीमागे मेट्रोचे काम सुरू असल्यामुळे इंटरनेटची सेवा वारंवार खंडीत होते व गती ही खूपच कमी असते. त्यामुळे १ नोंद संकेतस्थळावर प्रकाशित करण्यास १० मिनिटे वेळ लागतो.<br>त्यामुळे टिकोना या खाजगी कंपनीकडून इंटरनेट सेवा घेण्याकरीता दरमहा रू. ४५०० X ८ (महिने) = ३६,००० + १०,००० (इन्स्टॉलेशन खर्च) = ४६,०००/- इतका खर्च सन २०१९-२० साठी अपेक्षित आहे. | टिकोना कंपनीची इंटरनेट सेवा माहे ऑगस्ट २०१९ पासून घेण्यास व त्यासाठी येणाऱ्या रू. ४६,०००/- इतक्या खर्चास कार्योत्तर मंजुरी सर्वानुमते देण्यात आली. |
| ९ | मा. अध्यक्षांच्या अनुमतीने आयत्यावेळी घ्यावयाचे इतर विषय.<br>१) कुमार विश्वकोश नवीन संकेतस्थळ, मोबाईल ॲप तयार करणे. | सद्यस्थितीत कुमार विश्वकोश जीवसृष्टी आणि पर्यावरण खंड २ चे भाग ३ संकेतस्थळावर व भाग १ व २ मुद्रण स्वरूपात प्रकाशित झाले आहेत. कुमार विश्वकोश शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त उपयोग व्हावा याकरीता पुढील काळात ज्ञानमंडळासारखी योजना आखून त्याच्या प्रचार व प्रसारासाठी नवीन संकेतस्थळ, मोबाईल ॲप तयार जाईल असे मा. अध्यक्षांनी सांगितले. | कुमार विश्वकोशाचे स्वतंत्र संकेतस्थळ, मोबाईल ॲप तयार करण्यास व त्यासाठी येणाऱ्या खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | २) महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ व विकिमिडीया इंडिया, मराठी विकिमिडीअन्स युझर्स ग्रुप यांच्यामध्ये सामंजस्य करार करणे. | १) मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ व विकिमिडीया इंडिया, मराठी विकिमिडीअन्स युझर्स ग्रुप या दोन्हीं संस्थांचे उद्दिष्ट ज्ञानसंपन्न समाज निर्माण करणे आणि मुक्त ज्ञान निर्माण करण्यासाठी विविध व्यासपीठांची निर्मिती करणे. २) विश्वकोश आणि विकिपीडिया यांमध्ये लिहिणारे लेखक यांच्या लेखांचे, अनुभवाचे आदान-प्रदान करून विश्वकोश व समूह मराठी भाषेचा प्रचार व प्रसार करणे.<br>वरील दोन्हीं बाबी व अन्य करावयाच्या कामाबाबत सामजंस्य करार करण्याविषयी चर्चा झाली. | महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ व विकिमिडीया इंडिया, मराठी विकिमिडीअन्स युझर्स ग्रुप यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | ३) मराठी विश्वकोश ज्ञानमंडळ **ERP** **(Enterprise Resource Planner -** उपक्रम संसाधन नियोजक) संकेतस्थळावरील नोदींचे एन्रीचमेन्ट व अधिक प्रभावी सोशल मीडिया कनेक्ट करणे. | **ERP** - विविध विषयांच्या ज्ञानमंडळातील लिहिणारे लेखक, समन्वयक, विद्याव्यासंगी यांना थेट संकेतस्थळावर काम करता यावे, कुठूनही व कुठल्याही लेखकाला थेट माहिती पुरवता यावी, लेखकांना नोंदी थेट ऑनलाईन देता याव्यात, त्या समन्वयकांना तपासता याव्यात व त्यावर अभिप्राय देता यावे व ह्या सर्वांचे रिपोर्टस् व मानधनाचे / हिशोबाचे रिपोर्टस् देखील ऑनलाईन व ऑटोमॅटीक उपलब्ध व्हावे शिवाय ते त्या त्या संबंधितांना त्यांच्या अकाऊंटवर थेट पाहता यावे अशी रचना करणे प्रस्तावित आहे.<br>लेखकांची व प्रस्तावित नोदींची डेटाबँक तयार करून विषयांची व्याप्ती वाढवणे व डुप्लीकेशन टाळणे.<br>**नोदींचे समृध्दीकरण** (एन्रीचमेन्ट) - नोदींच्या समृध्दीकरणासाठी समर्पक चित्रे, व्हिडीओ, ऑडीओ कुणालाही अपलोड करता यावेत व योग्य तपासणीनंतर ते नोदींला जोडता यावेत व संबंधित व्यक्तीला त्याचे श्रेय व मोबदला देता यावा अशी रचना संकेतस्थळावरच करणे आवश्यक आहे.<br>**सोशल मिडीया व SEO** - वाचकांना माहिती पुरविण्याचे ४ प्रभावी माध्यम | मराठी विश्वकोशाचे https://marathivishwakosh.org/ हे संकेतस्थळ **ERP**, नोदींचे समृध्दीकरण व सोशल मीडिया कनेक्ट करण्यासाठी आवश्यक त्या तांत्रिक सुविधा करून घेण्यासाठी अंदाजित ५ ते ७ लाख रूपये येणाऱ्या खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | म्हणजे SEO, नोटिफिकेशन, इमेल व सोशल मिडीया. या चारही गोष्टीं केल्यास संकेतस्थळास भेट देणाऱ्या वाचकांची संख्या निश्चित वाढेल.<br>वरील तिन्हीं मुद्दयाबाबत सविस्तर चर्चा झाली. | |

यानंतर सर्व मान्यवरांचे आभार मानून मा. अध्यक्षांच्या अनुमतीने बैठक समाप्त झाली असे जाहीर करण्यात आले.

वरिष्ठ लिपिक ०३/०८/२०१८

मा. सचिव

मा. अध्यक्ष यांच्या मान्येस्तव सविनय सादर

मा. अध्यक्ष